e-ISJN: A4372-3088
p-ISJN: A4372-3089

ISSN: 2394-3122 (Online)
ISSN: 2394-6253 (Print)
Impact Factor: 6.03

Volume 11, Issue 12, December 2024
SK International Journal of Multidisciplinary Research Hub
Journal for all Subjects
Research Article / Survey Paper / Case Study
Published By: SK Publisher
(www.skpublisher.com)
*A Monthly Double-Blind Peer Reviewed Refereed Open Access Multidisciplinary & Multilingual International Journal*
Special Issue: Two Day National Interdisciplinary Conference on "Script Writing"
Organised by: Department of Languages, Shankarlal Khandelwal Arts, Science & Commerce College, Akola, Maharashtra 444002.
(Sponsored by Pradhan Mantri Uchchatar Shiksha Abhiyan Grants to Strengthen Colleges)

# नभोवाणीवरील संहिता लेखन व व्याप्ती(भाषण)

**डॉ. केशव विठ्ठल कोकाटे**
मराठी विभाग प्रमुख,
स्व.पुष्पादेवी पाटील कला व विज्ञान महाविद्यालय रिसोड
जि.वाशिम

DOI: https://doi.org/10.61165/sk.publisher.script.writing.2024.41

### प्रास्ताविक

आजचे युग हे माहिती व तंत्रज्ञानाचे युग म्हणून ओळखले जाते. विज्ञान तत्रज्ञान हे एकविसाव्या शतकाचे परवलीचे शब्द झाल्याचे दिसतात.विज्ञान-तंत्रज्ञानाचा वापर ही एक अपरिहार्य व व्यापक गरज म्हणून सर्वमान्य झाल्याचे दिसते.विज्ञान-तंत्रज्ञान वापराची मानवी जीवनाच्या सर्वच क्षेत्रांमध्ये वेगाने वाढ होताना दिसते.सध्याच्या माहिती तंत्रज्ञानाच्या युगात मराठी भाषा सुद्धा 'ग्लोबल' झाली आहे. विज्ञान तंत्रज्ञानाच्या वापराने आज नवं ज्ञानयुग आणले. आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभाव सर्वत्र दिसून येतो.विज्ञान युगाने पृथ्वीवरील सर्व मानवी जीवनाला आपल्या कक्षेत घेतले आहे.मानवी जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात विज्ञान-तंत्रज्ञानाने हस्तक्षेप केला आहे. प्रसार माध्यमांचा समाजमन जाणून घेण्यात मोलाचा सहभाग असतो.प्रसार माध्यमे व समाज यांचा परस्पर संबंध अनन्यसाधारण स्वरूपाचा आहे.समाजाचे निरीक्षण करून ,घडणाऱ्या घटनांची नोंद माध्यमे घेत असतात.परिवर्तनशील भूमिकेतून निकोप समाज निर्माण करण्यात मोलाचा हातभार लावत असतात.नभोवाणी या प्रसार माध्यमातील भाषणाच्या संहिता लेखनामध्ये भाषाशैली कशी असावी, भाषणाच्या संहिता लेखनामध्ये कोणकोणत्या बाबींचा समावेश असावा त्याचा शोध घेणे प्रस्तुत निबंध लेखनाचा हेतू आहे.

### नभोवाणी

माहिती तंत्रज्ञान युगात जग एक खेडे बनत चालले आहे.जगातील कुठल्याही काना कोपऱ्यातील वस्तू दुसऱ्या कोपऱ्या पर्यंत सहज व सोप्या पद्धतीने पोहोचल्या जात आहे. यामध्ये विविध प्रसार माध्यमांचा मोलाचा वाटा आपल्याला दिसून येतो. प्रसार माध्यमे ही मानवाच्या जगणे,व अस्तित्वाशी जोडले गेले.त्यामुळे त्याचा प्रभाव जीवनाच्या सर्वच क्षेत्रावर पडला. समाज,देश यांच्या सीमारेषा ओलांडून माणसे अत्यंत सहजतेने पलीकडे जाऊ लागली आहेत.जगाचे रूपांतर एका संपूर्णतेमध्ये झाले आहे.माहितीच्या महाप्रचंड जाळ्यात माणूस सापडला

आहे.भाषा,संस्कृती, साहित्य यावर प्रभाव पडत चाललेला आहे. झपाट्याने झालेल्या बदलामुळे सगळे भांबावून गेले आहेत. इंटरनेट,प्रसार माध्यमांमध्ये मोठा बदल झालेला दिसतो.

नभोवाणी सर्वांना परिचित सर्व जुने स्वस्त व सहज उपलब्ध असणारे साधने आजही खेडे आणि शहरामध्ये लोकप्रिय आहे. सर्व स्तरातील, गटातील लोकांसाठी आहे. सर्वच विषयाला गवसणी घालणारे श्राव्य माध्यम आहे.विसाव्या शतकात क्रांतिकारक प्रगती झाली.माहितीच्या प्रचार,प्रसारच्या अनेक साधनापैकी सर्व सामान्यांना परवडणारे आहे.सर्वांपर्यंत संदेश पोहोचणारे आहे.नभोवाणीचा प्रसार भारतात १९२६ पासून सुरू झाला.मार्कोनी या इटालियन शास्त्रज्ञांनी १८९५ साली बिनतारी संदेश यंत्रणेचा शोध लावला.मानवाचा शब्द हजारो किलोमीटर पर्यंत पोहोचू लागला.याच क्रांतिकारी तंत्राचा वापर करून आकाशवाणी जन्मास घातली.मार्कोनी या नावाने २३ फेब्रुवारी १९२० मध्ये पहिला रेडिओ कार्यक्रम इंग्लंडमध्ये प्रसारित केला गेला.नोव्हेंबर १९२२ पासून त्याचे नियमित प्रसारण करण्यात आले.भारतामध्ये याच दरम्यान संस्थानिकांनी रेडिओ स्टेशन स्थापन केली.इंडियन ब्रोड कॉस्टिंग कंपनी १९२६ मध्ये सुरू झाली.तिच्या वतीने मुंबई,कोलकत्ता येथे केंद्रे निर्माण करण्यात आली.पुढे नामांतरण आकाशवाणी केले केली. स्वातंत्र्योत्तर काळात 'बहुजन हिताय बहुजन सुखाय' या ब्रीदवाक्याने विविध कार्यक्रमाला सुरुवात झाली. केंद्रांचा विस्तार झाला.दिल्ली, चेन्नई, मुंबई येथे लघु लहरीवर काम करणारी अनेक प्रक्षेपण केंद्र उभारण्यात आली.स्थानिक आकाशांवाणी केंद्रांमधून स्थानिकांचे प्रश्न,शेती,पाणी दळणवळण यासोबतच स्थानिक कलावंतांना संधी मिळायला लागली.ज्ञान,माहिती,मनोरंजन हे रेडिओचे कार्य जोमाने सुरू झाले.

**प्रसारमाध्यमे स्वरूप, बदल**

आपल्या दैनंदिन जीवनामध्ये प्रसार माध्यमांचे खूप महत्त्व आहे.आजच्या युगाला'माहितीचे युग' म्हणून ओळखले जाते.वर्तमानपत्रांच्या अभावी आपण अस्वस्थ होतो. रेडिओ,दूरचित्रवाणी वरील कार्यक्रम तर आपल्या जीवनातील नित्याचाच भाग बनले आहे.प्रसार माध्यमे ही अत्यंत महत्वाची आहेत.माध्यमांमुळे भरपूर प्रसिद्धी मिळते.या चंदेरी दुनियेत वर्तमानपत्र असो किंवा प्रसार माध्यमे असो यांचे सर्वांनाच आकर्षण आहे. या माध्यमांचा महिमाच न्यारा आहे. क्षणात एखादी घटना माध्यमांमुळे सर्व दूर पोहोचते. ही माध्यमे संवेदनशील आणि शक्तीशाली अशा स्वरूपाची आहेत.आज तर ह्या माध्यमांचे जाळे सर्वदूर पसरलेले आहे. प्रत्येकाला आपले लेखन,भाषण,मुलाखत,रूपक,नाटक प्रसारमाध्यमांद्वारे प्रकाशित, प्रसारित व्हावे असे मनोमन वाटत असते. लोकशाही शासन व्यवस्था असणाऱ्या आपल्या देशामध्ये तर प्रसारमाध्यमांचे निश्चितच मोठे स्थान आहे. स्पर्धेच्या या युगात प्रसार माध्यमांचे महत्त्व तितकेच टिकूनही आहे. वृत्तपत्रांच्या वेळापत्रकाला मागे सारणाऱ्या, ताज्या बातम्या सलगपणे देणाऱ्या अनेक दूरचित्रवाहिन्या, नभोवाणी इलेक्ट्रॉनिक माध्यमातून सुरू झाल्या आहेत. तीव्र स्पर्धेच्या युगात नवे तंत्रज्ञान आले, गतिमानता आली.आज संपूर्ण जग माहिती, तंत्रज्ञानाने व्यापलेले आहे. सर्व देशांच्या भौगोलिक सीमा ओलांडून माहिती, तंत्रज्ञानाने अनेकांना आपल्या मोहजाळात अडकवलेले आहे. सर्वच क्षेत्रांना आपल्या कवेत घेतलेले आहे. पूर्वीपेक्षा यामुळे वेळ,पैसा आणि शक्ती बचत होते.एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी अगदी जलद गतीने संदेश पाठवण्यासाठी वापर होतो.प्रसार माध्यमांच्या साह्याने आपण क्षणात संदेश पाठवू शकतो त्यामुळे माहिती तंत्रज्ञान हे वरदान ठरताना दिसते.संदेश,विचार देवाण घेवाण कमी खर्चात आपण सहजतेने करू शकतो. मानवी जीवनामध्ये फार मोठे आदान-प्रदान

प्रसारमाध्यमे करतात.कमी खर्चात माहिती पाठवली जाते.यामुळे मानवी विकासालाही मदत होते.ज्ञान व माहिती मिळवण्यासाठी जगात आज असंख्य साधने उपलब्ध आहेत. या साधनामुळे पुन्हा आपण नव्या क्रांतीची वाटचाल करीत आहोत.स्वतःला समृद्ध बनवणे, हे आपल्याच हातात आहे. शेती, रेल्वे, विमान,उद्योग, बँक,वैद्यक क्षेत्र मुद्रण,जाहिरात, खेळ अशा कामाकरिता प्रसारमाध्यमे या सारख्या साधनाचा खूप मोठ्या प्रमाणावर वापर केला जात आहे.माध्यमांचा विचार केल्यानंतर माध्यमांमध्ये आमुलाग्र बदल झाल्याचे दिसून येतात. त्यावेळेस संक्रमणावस्थेमध्ये समाज जीवनामध्ये वेगाने होणाऱ्या परिवर्तनाला माध्यमाने अगदी सहजतेने व लीलया टिपले. व त्याचबरोबर स्वतःमध्येही अंगभूत बदल केल्याचे आपणाला स्पष्टपणे दिसून येते. समाजाचा चेहरा मोहरा अगदी स्पष्टपणे दाखवणाऱ्या प्रसार माध्यमांनी काळाबरोबर बदलत जाणे स्वीकारले. वृत्तपत्र, टपाल,रेडिओ, दूरदर्शन, ई-मेल, संगणक या सर्वांमधील बदल हा नजरेत भरण्याजोगा आहे.स्वरूपाचा विचार केल्यानंतर ठामपणे असे म्हणता येते की, सर्व प्रसार माध्यमांमध्ये अगदी झपाट्याने क्रांती झाल्याचे आपल्याला दिसून येते.

भाषण संहितेची भाषा कशी असावी

नभोवाणी हे केवळ ऐकण्यासाठी म्हणून श्राव्य माध्यम आहे.'एक आयामी' माध्यम आहे. शब्दाच्या,भाषेच्या उपयोजनाला या ठिकाणी खूपच महत्त्व असते. सामाजिक बदल घडवून आणण्यासाठी जनमत बनवण्याची मोठी ताकद या माध्यमातून आहे व संपूर्ण जबाबदारी त्या माध्यमातून पार पाडताना भाषा योग्य व नीटनेटकी असावी. येथील शब्द श्रोत्यांच्या एकदाच आणि काही सेकंद कानावर पडतात.त्याची पुनरावृत्ती होत नसल्याने अनुभव नभोवाणी वरील संहिता करताना भाषेला खूपच महत्त्व द्यावे लागते. भाषा शैली इतकीच प्रत्यक्ष लेखनही महत्त्वाची असते.

भाषण संहिता कशी असावी

कथा कादंबरी प्रमाणे येथील संहिता लेखन हे 'स्वांत सुखाय' करण्याची गोष्ट नव्हे हे लक्षात घ्यायला लागते. संहिता लेखन करताना आवश्यक कौशल्ये असावी लागतात १) भाषा सोपी सहज सुटसुटीत असावी, क्लिष्ट अवघड नसावी २) अपमान जनक वाक्ये नसावीत ३) विषयाला धरूनच लेखन हवे ४) अर्थाचा अनर्थ करणारी वाक्य नसावीच ५) अनावश्यक पुनरावृत्ती टाळावी ६) अनावश्यक तपशील टाळावा ७) भाषिक कौशल्याचे आत्मसातीकरण करून योग्य ते प्रकटीकरण करावे ७) श्रोत्याचे लक्ष ठेवून ठेवणारे शब्द असावेत ८) प्रारंभ,मध्य,शेवट अशी मांडणी असावी ९) वेळेचे बंधन आणि वाचनाचे वेग लक्षात घेऊन संहितेतील शब्दांची संख्या असावी १०) लेखन व वाचनाला सारखेच महत्त्व आहे हे लक्षात ठेवावे.

## समारोप

नभोवाणी हे समाज माध्यम असून श्रोत्यांना मोहित करणारे आहे. समाज जीवनाला भाषिक,बौद्धिक,सांस्कृतिक सज्ञान उन्नत करण्यात महत्त्वाची भूमिका निभावणारे आहे.दुनियेच्या काना कोपऱ्यातीलतील माहिती वस्तू,ज्ञान, आदान प्रदान यामुळे सहज शक्य झाले आहे.नमोवाणी या प्रसार माध्यमाचे संहिता लेखन कसे करावे,कोणती काळजी घ्यावी याविषयी विस्तृत विचार केल्यानंतर खालील निष्कर्षप्रत पोहोचता येते

निष्कर्ष

१) नभोवाणी संहिता लेखन करताना योग्य कौशल्य असणे आवश्यक ठरते.

२) नभोवाणी संहिता लेखन करताना योग्य ती काळजी घेणे महत्त्वाचे असते.

३)नभोवाणी संहिता लेखन करताना शब्दांची योग्य निवड करावी.

४) नभोवाणी हे श्राव्यमाध्यम असल्याचे लक्ष ठेवावे.

५) नभोवाणीचे पूर्वीचे स्वरूप साधे होते नंतर हळूहळू त्यात बदल होत गेले.

६) नभोवाणी हे प्रसार माध्यम हे समाज जीवनासाठी उपकारक ठरताना दिसते.

## संदर्भ ग्रंथ

०१) प्रसार माध्यमांसाठी लेखन कौशल्य-संपादक डॉ. रमेश वरखेडे, य.च.म.मुक्त विद्यापीठ नाशिक, ऑक्टोबर १९२०

२) व्यवहारीक मराठी -पुणे विद्यापीठ प्रकाशन पुणे.

३) सौ.पुष्पा काणे, नभोवाणी कार्यक्रम तंत्र आणि मंत्र इंडिया बुक कंपनी, पुणे -३०

:::. Cite this article .:::

कोकाटे, डॉ. केशव विठ्ठल. (2024). नभोवाणीवरील संहिता लेखन व व्याप्ती(भाषण). Two Day National Interdisciplinary Conference on Script Writing, 189–192.

https://doi.org/10.61165/sk.publisher.script.writing.2024.41